नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 22/04/2020 (बुधवार)
(दुपार)

## उमरेड परिसरात अवैध मोहाफुल गावठी दारू अड्डयावर स्थानिक गुन्हे शाखेची धाड
## मौजा दहेगाव शिवार येथील घटना
## एकुण 1,88,500/— रू चा मुद्देमाल जप्त

दिनांक 21.04.2020 रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण चे पथक पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत कोवीड 19 संबंधाने पेट्रोलींग करीत असता पोलीस मित्राद्वारे खात्रीशिर बातमी मिळाली की, पोस्टे उमरेड हद्दीत मौजा दहेगाव शिवारात अवैधरित्या मोहाफुल हातभट्टी गाळत असल्याचे माहितीवरून मौजा दहेगाव येथे छापा टाकला असता घटनास्थळावरून एकुण 13 ड्रम ज्यात 2,600 लिटर मोहाफुल गावठी दारू गाळण्याचे रसायण (सडवा), व मोहाफुल गाळण्याचे साहित्य असा एकुण 1,88,500/— रू चा माल जप्त करण्यता आला. आरोपीतांविरूध्द पोस्टे उमरेड येथे महाराष्ट्र दारूबंदी कायदयान्वये कार्यवाही करून पुढील कार्यवाही करीता पोस्टे उमरेड यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात सहा. फौजदार बाबा केचे, पोलीस हवालदार चंद्रशेखर घडेकर, महेश जाधव, गजेंद्र चौधरी, पोलीस नायक रामराव आडे, सुरेश गाते, पोलीस शिपाई रोहण डाखोरे, अमोल वाघ, महिला पोलीस शिपाई नम्रता बघेल, चालक पोलीस नायक अमोल कुथे यांनी पार पाडली.



## तिडंगी पारधी बेडा वर पोलिस व गावकऱ्यांची संयुक्तीक कार्यवाही

पो.स्टे. केळवद :– मौजा तिडंगी पारधी बेडा येथे मोठया प्रमाणात हातभट्टी लावुन मोहाफुलाची गावठी दारू काढीत आहे. त्यामुळे तिडंगी गावातील लोकांना त्रास होत आहे. 'गावातील दारू बंदी करा आम्ही तुम्हाला सहयोग करतो'. अशी तक्रार पो. स्टे केळवद येथे केली असता. तक्राराची तात्काळ दखल घेऊन पो. स्टे केळवद व तिडंगी गावातील गावकऱ्यांनी मिळुन दिनांक 21/04/2020 चे 10.30 वा. दरम्यान मौजा तिडंगी पारधी बेडा येथे संयुक्त रेड केली. ठिकठिकाणी अवैधरित्या हातभट्टी लावून मोहाफुल गावठी दारू काढतांना दिसून आले. दगळविटाच्या चुलीवर लोखंडी ड्रम ठेऊन नळ व्दारे मोहुल गावठी दारू काढण्याची रनींग भट्टी आढळुन आल्या. तसेच बंडयावरील घराचे आजुबाजुला निळया रंगाचा 200 लिटरच्या प्लास्टिक ड्रम मध्ये मोहाफुल सडवा भरलेलादिसला. दारू काढणारे आरोपी पोलिसांना पाहून जंगलाच्या दिशेने पळून गेले. सदर ठिकाणी खालील वर्णणाचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला.

1) 35 ड्रम मध्ये प्रत्येकी 200 लिटर मोहफुल रसाययन सळवा असा एकुण 7000 लिटर प्रती लिटर 80/–रू. असा एकुण कि. 5,60,000/–रू., 2) 250 लिटर तयार मोहाफुल गावठी दारू प्रती 125/–रू. लिटर प्रमाणे एकुण कि. 31,250/–रू., 3) 250 कि.ग्रा मोहाफुल प्रत्येकी 80/–रू. कि. लो. असे एकुण 20,000/–रू., 4) 35 निळया रंगाचे रंगाचे खाली ड्रम असे एकुण कि. 35,000/–रू., 5) 5 नग लोखंडी ड्रम मध्ये उकडलेले मोहुल रसायन ने भरलेले एकुण 500 लिटर कि. 50,000/–रू. 6) 5 नग लोखंडी ड्रमकि 6,000/–रू., 3 टन जळाऊ लाकुड कि. 7,500/–रू., 7) 5 बॅग गुळ भेली 75 कि. ग्रा कि. 3,750/–रू., 8) इतर दारू गाळण्याचे साहीत्य पाईप व इतर साहित्य कि. 4,000/–रू. असा एकुण कि. 7,17,500/–रू. चा मुद्देमालमिळून आला. सदर गुन्हयात आरोपी नामे– महीपाल किशोर तारवाडी, 2) संदीप अनिल राजपुत, 3) अमीत चंद्रपाल राजपुत, 4) संदीप दिलीप राजपुत, 5) जबतपालकिशोर मारवाडी, 6) अविनाश संजय पवार, 7) दिलीप संतोष राजपुत, 8) चंद्रपाल संतोष राजपुत, 9) दिपक संतोष राजपुत सर्व रा. पारधी बेडा यांनी अवैधरित्या विनापरवाना मोहाफुल दारू गाळण्याचे साहित्य बाळगुण हातभट्टी चालवुन मोहाफुल दारू तयार करतांना मिळुन आले. आरोपीतांविरूद्ध पो. स्टे. केळवद येथे अप क्र. 83/2020 कलम 65 बी.सी.ई.एफ. महाराष्ट्रदारूब्रदी कायद्यान्वेय गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोउपनि श्री. अर्जुन राठोड पो. स्टे. केळवद हे करीत आहेत.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला, अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती मोनिका राऊत, श्री. अशोक सरंबळकर उपविभागीय पोलिस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार पो. स्टे. केळवदचे सहायक पोलीस निरीक्षक श्री. सुरेश मट्टामी, पोउपनि श्री अर्जुन राठोड, सफौ शम्मी शेख, अमरदिप कामठे, पोहवा अरूण गुंठे, पोना राजेन्द्र रेवतकर, पंकज ठाकुर, मनापोशि अश्विनी रंगारी, पोशि सचिन येळकर, अंकीत ठाकरे, श्रीधर कुलकर्णी, धोडुतात्या देवकते, 3 होमगार्ड सैनीक व तिडंगी गावातील उपसरपंच नामे— 1) रोशन अशोक राऊत, 2) दिलीप सेवकराम घुगल, 3) अंकुश गुलागराव आसोले, 4)विठठल महादेवजी वाडी, 5) सौ. बेबीबाई भगवानदास मेश्राम, 6) राहुल चंद्रमनी बांबुळकर, 7) अंकुश महादेवारव सोनटक्के, 8) विजय मारोती भुतमारे, 9) लोकेश बंडेराव ठाकेरे व इतर गावकरी यांच्या मदतीने तिडंगी पारधी बेडा येथे यशस्वीरीत्या पार पाडली आहे.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर